## नि.दि.मु.क्र. १३८/२०११ मधील आय.ए. क्र. २/२०२० (निशाणी १२६) वरील आदेश

प्रस्तुत अर्ज हा वादीने त्याच्या विरुध्द झालेला निशाणी ११६ कडील न्यायालयीन आयुक्त अहवाल विनाम्हणणे चालविण्याचा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र. ६ चे असे म्हणणे आहे की तो साथीच्या तापाने आजारी असल्याने त्याला न्यायालयात हजर राहून न्यायालयीन आयुक्त अहवालावर म्हणणे दाखल करणे शक्य झालेले नाही. त्या कारणे त्याच्याविरुध्द विनाम्हणणेचा आदेश पारीत झालेला आहे. त्याला न्यायालयीन आयुक्त अहवालावर त्याचे म्हणणे द्यायचे आहे. न्यायपुर्ततेच्या दृष्टीने त्याच्याविरुध्द झालेला आदेश रद्द होणे आवश्यक आहे. न्यायालयीन आयुक्त अहवालावर त्याचे म्हणणे न स्वीकारल्यास त्याचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्याचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी त्याने विनंती केली.

**०३.** वादीने त्याचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास तीव्र हरकत घेतलेली आहे. त्याचे असे म्हणणे आहे की अर्ज खोटा व खोडसाळ आहे. साथीच्या आजाराबाबतचे कोणतेही मेडीकल सर्टीफिकेट देण्यात आलेले नाही. प्रतिवादीस मुद्दामहून वेळ काढायचा असल्यामुळे त्याने म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी वादीने विनंती केली आहे.

**०४.** दोन्ही बाजूच्या विधीज्ञांच्या युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

**०५.** अभिलेखाचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. ६ विरुध्द दि.

०९/१२/२०१९ रोजी न्यायालयीन आयुक्त अहवाल विनाम्हणणे चालविण्याचा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र. ६ ने प्रस्तुत अर्ज दि. २१/०१/२०२० रोजी म्हणजेच जवळजवळ दिड महिन्यांच्या विलंबाने दाखल केलेला आहे. सदर विलंब हा तो साथीच्या रोगाने आजारी असल्याने झाल्याचे प्रतिवादी क्र. ६ चे म्हणणे आहे. त्याचे सदरचे कथन हे त्याने शपथेवर सांगितले आहे. नैसर्गिक न्यायतत्त्वाच्या आधारे दोन्ही बाजूंना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याचे व न्यायालयीन आयुक्त अहवालाचे स्वरुप पाहता आणि सदर अर्जामध्ये दोन्ही बाजूंच्या हक्कांबाबतचा निर्णय होणार असल्याने प्रतिवादी क्र. ६ ला न्यायालयीन आयुक्त अहवालावर त्याचे म्हणणे दाखल करण्याची परवानगी देणे उचित होईल असे मला वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो.

प्रतिवादी क्र. ६ विरुध्द झालेला दि. ०९/१२/२०१९ रोजीचा न्यायालयीन आयुक्त अहवाल विनाम्हणणे चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो व त्याचे म्हणणे स्वीकारण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by BHANUPRATAP B. CHOUHAN
Date: 2022.01.29 15:10:17 +0530

दि. २९/०१/२०२२ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER